अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक -२०१९/प्र.क्र.७३/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ०८ मार्च, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.
२) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.५/३/२०१८
३) शासन पत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बैठक-२०१९/प्र.क्र.७३/बांधकामे दि. ८/३/२०१९.

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात विकासासाठी अनुसूचित जाती उपाययोजना राबविण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे यासाठी स्थापन केलेल्या संबंधित स्वयंसेवी संस्थांना त्यांच्या मागणीनुसार निधी मंजूर केला जातो. त्यानुषंगाने संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये योजनेच्या संबंधित अटी व शर्ती लागू करण्यात आल्या आहे. उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये मा.मंत्री (सा.न्या. व वि.स.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्वयंसेवी संस्थांची निवड करण्याकरीता निवड समिती गठीत करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. १ अन्वये मा. मंत्री (सा.न्या. व वि.स.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात समितीची दि.२१/२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्र. ३ येथील दि.८/३/२०१९ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे. सदर इतिवृत्तासोबतच्या परिशिष्ट “अ” नुसार एकूण ९ स्वयंसेवी संस्थांना निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर ठिकाणांच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाला उपरोक्त समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर कामांना तत्वत: मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात विकासासाठी अनुसूचित जाती उपाययोजना राबविण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे यासाठी स्थापन केलेल्या संबंधित स्वयंसेवी संस्थांना त्यांच्या मागणीनुसार निधी मंजूर केला जातो. त्यानुषंगाने संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये योजनेच्या संबंधित अटी व शर्ती लागू करण्यात आल्या आहे..संदर्भ क्र. १ अन्वये मा. मंत्री (सा.न्या. व वि.स.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची दि.२१/२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत एकूण ९ स्वयंसेवी संस्थांच्या विविध विकास कामांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने दि. ८/३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे. सदर कामाची यादी परिशिष्ट “अ” मध्ये या शासन निर्णयासोबत जोडण्यात आली असून परिशिष्ट “अ” मध्ये दर्शविलेल्या कामांना त्यांच्यापुढे दर्शविलेल्या रकमेस या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१८-१९ या वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे यासाठी स्थापन केलेल्या संबंधित स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान लेखाशिर्ष २२२५ ३६३६ अंतर्गत रू.१००.०० कोटी तरतूद करण्यात आली असून त्यापैकी ८०.०० कोटी इतका निधी आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांना वितरीत करण्यात आला आहे. परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केलेल्या कामांसाठी आवश्यक असलेला योजनेच्या अटी व शर्तीनुसार ९०% इतका निधी रक्कम रू.२२,३६,६६,२००/-(अक्षरी रूपये बावीस कोटी छत्तीस लक्ष सहासष्ट हजार दोनशे फक्त) इतका निधी आहरीत करून संबंधित सहायक आयुक्त यांच्या खात्यावर वर्ग करावा. सदर कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधित सहाय्यक आयुक्त यांनी संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयातील तरतुदी, अटी व शतीच्या अधीन राहून संस्था व सहाय्यक आयुक्त यांच्या संयुक्त खात्यावर जमा करावा.

३. प्रस्तुतचा शासन निर्णय अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे यासाठी स्थापन केलेल्या संबंधित स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान संदर्भ क्र. १ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. २१/२/२०१९ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक १ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०३१०१७३५०३२५२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: CN = Anil Kondaji Ahire, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice and Special Assistance Department
Date: 2019.03.10 17:37:43 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
५) महालेखापाल,महाराष्ट्र,१,मुंबई
६) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
९) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१०) समन्वयक तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे
११) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग
१२) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१३) निवासी लेखा परिक्षक, मुंबई
१४) अधिदान व लेखा लेखा अधिकारी,मुंबई

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बैठक-२०१९/प्र.क्र.७३/बांधकामे, दि.८/३/२०१९ चे परिशिष्ट “अ”

अ.क्र.	संस्थेचे नाव व पत्ता	कामाचा तपशील	मंजर रक्कम
१	बहुजन विकास समिती, मौजे एकदरा ता.जि.नांदेड	मौजे एकदरा ता.जि.नांदेड येथे योगा हॉल, सांस्कृतिक सभागृह इत्यादी	रु.२.०० कोटी
२	राहुल फाऊंडेशन ब्रिजवाडी, एम.आय.डी.सी.एरिया, चिखलठाणा, औरंगाबाद	मौजे खामगांव, ता.बदनापूर, जि.जालना येथे बुध्दिष्ट मेडीटेशन सेंटरचे बांधकाम करणेबाबत.	रु.२.०० कोटी
३	राजेश्वरी एज्युकेशन सोसायटी, भिमनगर, पेठेनगर रोड, औरंगाबाद	ग्लोबल मेडीटेशन ॲण्ड रिसर्च सेंटरचे बांधकाम करणेबाबत	रु.२.०० कोटी
४	महाबोधी इंटरनॅशनल मेडीटेशन सेंटर, लेह लडाख, जम्मु आणि काश्मिर	इंटरनॅशनल मेडीटेशन सेंटर बांधकाम	रु.५.०० कोटी
५	सावित्रीबाई फुले महिला बहुउद्देशिय मंडळ, श्रध्दानगर, ता.दिग्रस, जि.यवतमाळ	मेडीटेशन हॉल व सामाजिक सभागृहाचे बांधकाम करणे.	रु.२.०० कोटी
६	धम्मिको चॅरेटेबल ट्रस्ट गोंदिया व्दारा संचलित धम्मगोडा विपश्यना केंद्र, ओझीटोला, ता.जि.गोंदिया	धम्मगोडा विपश्यना केंद्र, ओझीटोला, ता.जि.गोंदिया येथे आवार भिंत, डांबरीरोड रस्ता व नाला सुरक्षा भिंत इ. बांधकामाबाबत.	रु.१,८५,१८,०००/-
७	धम्मयान एज्युकेशन ॲण्ड चारिटेबल ट्रस्ट, ता.जि.औरंगाबाद	८० आर जागेवर मेडीटेशन सेंटर व व रिसर्च सेंटर बांधणे	रु.५.०० कोटी
८	अण्णा भाऊ साठे फाऊंडेशन, बोरीवली, मुंबई	देगलूर येथे संबोधि सांस्कृतिक सभागृह, विपश्यना केंद्र, ग्रंथालय, अभ्यासिका इ.बांधकाम	रु.३.०० कोटी
९	गोविंदराव पाटील चिखलीकर शिक्षण प्रसारक मंडळ, तांदळी, जि.नांदेड	मौरे कबनुर, ता.मुखेड, जि.नांदेड येथे विश्वरत्न सांस्कृतिक सभागृह, विपश्यना केंद्र, ग्रंथलय, अभ्यासिका इत्यादीचे बांधकाम करणेबाबत	रु.२.०० कोटी
		एकूण	**रू. २४,८५,१८,०००/-**

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: CN = Anil Kondaji Ahire, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice and Special Assistance Department
Date: 2019.03.10 17:38:13 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन